# Model Answer
## Set- II
### Std. – 10th EM
### Subject – Marathi L.L.



**Time : 3 Hrs.** **Marks : 80**

**विभाग – १ गदय**

**प्र.१ अ) पुढील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) अ) संतकाव्य आ) पंतकाव्य इ) मध्ययुगीन काव्य ई) शाहिरी काव्य

२) i) २७ फेब्रुवारी हा वि.वा. शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आहे.

ii) प्रस्तुत उता-यात उल्लेखलेल्या दोन कविता –

अ) ही आवडते मज मनापासूनी शाळा. आ) श्रावणमासी हर्ष मनासी.

३) 'रंग साहित्याचे' या पाठातून साहित्य / वाङ:मयातील विविध प्रकारांची ओळख नाट्यमय पद्धतीने अतिशय मनोरंजक रीतीने करून दिली आहे. साहित्य संपदेला संपन्न करणा-या कथा, कादंब-या, ललितसाहित्य, कविता, नाट्य, चरित्रे – आत्मचरित्रे, प्रवासवर्णन अशा अनेक साहित्यप्रकारांबद्द्लची माहिती त्यांच्या वैशिष्ट्यांसह पाठात दिली आहे. त्याचबरोबर मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिकांची नावेही या पाठातून मला माहीती झाली.

**प्र.१ आ) पुढील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) **चौकटी पूर्ण करा:**

i) अब्दुलच्या हातात असलेल्या दोन वस्तू – अ) बांगड्यांची पेटी आ) पिशवी

ii) अब्दुलच्या पेटीत असलेल्या बांगड्यांचे रंग – अ) लाल आ) हिरवा

२) **पुढील घटना योग्य त्या क्रमाने लिहा:**

ii) अब्दुल बसस्टॉपवर आला.

iv) बस आली.

i) अब्दुल बसमध्ये चढला.

iii) अब्दुल अगदी खिडकीजवळ बसला.

३) **स्वमत:**

अब्दुल आपल्या घरातून तपोवनाकडे जायला निघाला तेव्हा बाहेर थंडी होती. एवढ्या कडाक्याच्या थंडीतही अब्दुल तपोवनातील स्त्रियांना बांगड्या भरण्यासाठी निघाला होता. स्वत:च्या हलाखीच्या परिस्थितीतही त्याला जनसेवा करण्याची व माणुसकी जपण्याची मनापासून इच्छा होती. यातून त्याची दुस-यांविषयी असलेली कळकळ दिसून येते.

आपण तपोवनातल्या महिला व मुलींना बांगड्या दिल्यावर त्यांच्या चेह-यावर कसा आनंद पसरेल या विचारानेच तो हरखून जातो. यामधून त्याची परोपकारातून आनंद मिळवण्याची वृत्ती दिसते. कुष्ठरोगी महिलांची सेवा मोफत बांगड्या देऊन तो करत आहे. थंडीवायाची पर्वा न करता प्रवास करत आहे. यावरून त्याची परोपकार व समाजसेवेवरील निष्ठा दिसून येते. अशा प्रकारे अब्दुल समाजाचा एक आदर्श घटक म्हणून आपल्या मनात ठसतो.

**अपठित गदय**

**प्र.१ इ) पुढील अपठित उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१) आकृत्या पूर्ण करा :** i)

**आंब्याच्या झाडाला लागणारे हवामान -** → i) **गरम**
→ ii) **कोरडे**

ii) **फळांचा रंग** → **पिवळे**, **हिरवे**

**२) i) एका वाक्यात उत्तर लिहा :**

उन्हाळा आपल्या मनात काहीतरी रसाळ, गोड आणि स्वादिष्ट, जे खायला प्रिय असे काही मिळेल, ही भावना रूजवतो.

**ii) साखळी पूर्ण करा :**

आंब्यापासून बनणारे पदार्थ → लोणची व मुरंबे

**विभाग २ : पदय**

**प्र.२ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१) चौकट पूर्ण करा.**

i) मुळात मुरावं घट्ट पाय रोवीत झाडासारखं ii) जगावं हिरवंगार झाडासारखं
iii) रोजच चिंतन करावं झाडासारखं iv) हसावं झाडाच्या सळसळत्या पानासारखं

**२) i) योग्य पर्याय निवडा व वाक्य पुन्हा लिहा.**

<u>पानझडीनंतर</u> झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं.

ii) मरगळ कधी झटकली जाते?

३) अ) वस्त्र – कपडा ब) मुसाफिर – प्रवासी क) संथ – मंद, हळू ड) चिंतन - मनन

४) हवेच्या झोताबरोबर झाडाची सळसळणारी पाने पाहिली की जणू झाड हसतेय असा भास होतो. आपणही थोड्याश्या सुखाने सुखावतो हेच जणू स्पष्ट होते. आपण हे सुखाचे क्षण कसे घ्यावे हे पानांकडून शिकावे. एखाद्या गोष्टीत झाडाच्या मुळासारखं पूर्णपणे मग्न व्हावं. झाडे जमिनीत खोलवर जातात. पाण्याचा शोध घेतात. मातीशी घट्ट नातं जोडतात. त्यामुळे खोड, फांदया, पाने, फुले बहरून येतात. जीवनात आपण असं मुळातून म्हणजे पूर्णपणे मुरलं पाहिजे तरच पुढची पिढी भक्कमपणे उभी राहील, बहरेल हा भाव या ओळीतून दिसून येतो. निर्धाराने जो पुढे जातो तो जिंकतो हा भाव मनाला आनंद देतो. जीवन हे सुखदु:खाने भरलेलं आहे. पण झाडे ज्याप्रमाणे पानगळीचे दु:ख विसरून पुन्हा हिरवी होतात, ताजी बनतात, स्वतः आनंदी राहून इतरांनाही आनंद देतात तसंच आपणही दु:ख विसरून सुखाला स्वीकारत जगणं शिकलं पाहिजे असा भाव या ओळींतून प्रगट होतो. आपले जीवन झाडासारखे आहे हा भाव काव्याचे सौंदर्य वाढविणारा आहे.

**प्र.२ आ) 'अंकिला मी दास तुझा' व 'स्वप्न करू साकार' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्दयांना अनुसरून कृती सोडवा.**

**<u>अंकिला मी दास तुझा</u>** :

१) प्रस्तुत कवितेचे कवी – संत नामदेव

२) कवितेचा रचनाप्रकार – अभंग

३) कवितेचा विषय – देवाला आई मानून, देवरूपी मातेने बाळाचा म्हणजेच आपला सांभाळ मायेने करावा, अशी विनवणी करणारा हा अभंग आहे.

४) शब्दांचा अर्थ – अ) कनवाळू – दयाळू ब) धरणी – पृथ्वी क) हंबरत – हांबरत / ओरडत ड) पाऊस -

वर्षा

५) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – या अभंगात संत नामदेव यांनी श्रीविठ्ठलाला आई संबोधून स्वत:चा सांभाळ करण्याची विनवणी केली आहे. हा अभंग वाचताना मला सतत माझ्या आईची आठवण झाली. आई किती जपते आपल्याला! देवानेही आईप्रमाणे आपल्यावर मायेची नित्य पखरण करावी, हा विचारच मनाला भावला. म्हणूनच मला हा अभंग खूप आवडला.

६) कवितेतून मिळणारा संदेश – संत नामदेव देवाला आई मानून, आपला सांभाळ बाळाप्रमाणे करावा असे विनवतात. ज्याप्रमाणे आपणही देवाचरणी लीन व्हावे; म्हणजे तो आईप्रमाणे आपला सांभाळ करील, असा दृढ विश्वास संत नामदेव या अभंगातून व्यक्त करतात.

**स्वप्न करु साकार** :

१) प्रस्तुत कवितेचे कवी – किशोर पाठक

२) कवितेचा रचनाप्रकार – देशभक्तीपर गीतरचना

३) कवितेचा विषय – देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न या कवितेत रेखाटले आहे.

४) शब्दांचा अर्थ – अ) नौबत – डंका   ब) लाखदा – लाख वेळा   क) हस्त – हात     ड) संपदा – संपत्ती

५) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे – या गीतात नव्या पिढीचे नव्या युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी कवींनी मार्गदर्शन केले आहे. हे करताना कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचा पुरस्कार केला आहे. नविन पिढीसाठी नवी स्वप्ने साकार करण्याचा विचार मांडणारी ही कविता मला आवडली.

६) कवितेतून मिळणारा संदेश – या गीतात कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकात्मतेचे सामर्थ्य या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. भारतीयांचा या मातीवरती हक्क आहे आणि नव्या पिढीचे नव्या युगाचे स्वप्न साकार करणे या कर्तव्याची जाणीव करुन दिली आहे.

## विभाग ३ : स्थूलवाचन

**प्र.३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

**१)** दररोज नित्यनेमाने सूर्य उगवतो. सर्व जगाला, सर्व सृष्टीला, चराचराला प्रकाश देतो, ऊर्जा देतो, चैतन्य देतो. पृथ्वीला तेज बहाल करण्याचे कार्य तो अविरतपणे पार पाडतो. तो जेव्हा मावळायला जातो, तेव्हा त्याच्या मनात एक खंत कायम उद्‌भवते, की मी गेल्यावर या धरतीची काळजी कोण घेईल? पृथ्वी सारी अंधारात बुडेल, तेव्हा तिला माझ्यासारखे कोण उजळेल. या विचाराने सूर्याचे डोळे पाणावतात. गुरुदेव टागोरांनी या कवितेत सूर्याचे पृथ्वीवर असलेले निर्व्याज प्रेम आर्त शब्दांत व्यक्त केले आहे. या कवितेतून सूर्याची आईच्या प्रेमळपणाची व मायेची भूमिका प्रकट होते.

**२)** पूर्वी घरोघरी मातीच्या चुली होत्या. त्यावरच स्वयंपाक करीत. प्रत्येक घरातील वाद-विवाद, समज-गैरसमज, रितीभाती साधारणपणे सारख्याच होत्या; त्यामुळे 'घरोघरी मातीच्या चुली' हा वाक्प्रचार तयार झाला. म्हणजे सगळीकडे सारखीच परिस्थिती असा याचा अर्थ होय. पण चुलीची जागा आता गॅसच्या शेगड्यांनी किंवा स्टोव्हने घेतली. आता बदलत्या काळाप्रमाणे 'घरोघरी गॅसच्या शेगड्या' असे म्हणायला हरकत नाही. पूर्वी 'टपोरी' या शब्दाचा अर्थ मोठी-टवटवीत-आकर्षक असा होता. सहसा फुलांसाठी हे विशेषण वापरीत. टपोरी मोगऱ्याची फुले, टपोरे डोळे वगैरे. हल्ली टपोरी या शब्दाचा अर्थ दुस-याची टिंगल-टवाळी करणारी असा झाला आहे. कदाचित एखादया टपरीवर उभे राहून दुसऱ्यांची टिंगल – टवाळी करणारी मुले यावरून हा अर्थ तयार असावा पण दोन्ही अर्थ भिन्न आहेत हे खरे.

**३)** अनेकदा आपण हा अनुभव घेतो की एखादे काम हाती घेतले जाते तेव्हा त्याविषयी आपण इतरांजवळ बोलायला लागतो, चर्चा करायला लागतो. त्या विषयी निष्कर्ष, अनुमान करायला लागतो. पण काही वेळेस ते काम इतकं चर्चेत येतं, त्याबद्दल इतकी मतमतांतरे होऊ लागतात की तुमचा आत्मविश्वास डळमळीत होतो. मग जे काम तुम्ही आत्मविश्वासाने हाती घेतलेलं आहे त्या कामाबाबत तुमचा विश्वास कमी पडायला लागतो आणि तुमची त्या कामाबाबत ची निष्ठा ढासळते. कदाचित तुम्ही ते काम सोडूनही देता. म्हणून असं म्हटलं

जातं की कोणतंही काम हाती घेताना त्याची उपयुक्तता, परिणाम याबाबत सखोल विचार करावा. त्याच्या शक्यता धोके हे तपासून पाहावेत आणि त्या कामाला सुरुवात करावी. काम चालू केल्यावर अनेक धोके निर्माण होऊ शकतात. त्यावर मात करण्यासाठी आपल्या विश्वासातील मंडळींची साथ घ्यावी. काम करताना त्याचा फार गाजावाजा न करता ते काम पुर्ण झाल्यावरच त्या बद्दल बोलावं. असं काम चांगल्या दर्जाचे होऊ शकते. कारण त्यात तुमची सच्चाई, निष्ठा पणाला लागलेली असते. गावभर दिंडोरा आणि हाती कटोरा अशी स्थिती निर्माण होण्यापेक्षा काम करण्यावर भर द्यावा. त्याला प्रसिद्धी आपोआप नंतर मिळते. हेच काही उदाहरणातून सांगता येते जेव्हा राजकीय पुढारी एखाद्या संकल्पाची उपक्रमाची घोषणा करतात तेव्हा ती पूर्णत्वास नेण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागतो कधी कधी ते उपक्रम यशस्वी होतही नाहीत. म्हणून आपण चेष्टेने म्हणतो की, राजकारण्यांच्या घोषणा म्हणजे निव्वळ पोकळ घोषणा तर दुसरीकडे आपल्याला निष्ठेने काम करणारी मंडळी दिसतात त्यांच्या कामात सातत्य असतं उदाहरणार्थ सिंधुताई सपकाळ.

**विभाग ४ : भाषाभ्यास**

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१) पुढील वाक्यांचे प्रकार ऒळखा.

**i**) मरगळ झटकून टाकावी. - विधानार्थी वाक्य़

**ii**) किती मोठी आहे तुझी शाळा! – उद्गारार्थी वाक्य

२) **कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यरूपांतर करा.**

i) ताजमहल फारच सुंदर आहे.

ii) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काय केले नाही?

३) **पुढील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)**

i) पायांना स्पर्श करणे – नमस्कार करणे – आपल्या गुरूजनांच्या पायाला स्पर्श करावा.

ii) भारावून जाणे – प्रभावित होणे – स्वामी विवेकानंदांना बघुन रविवर्मा भारावून गेला.

iii) आनंद गगनात न मावणे – खूप आनंद होणे – सैनिकाला खूप वर्षानंतर आचनक दारात बघून आईचा
आनंद गगनात मावत नव्हता.

**प्र.४ आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

१) **शब्दसंपत्ती**.

i) जीवन ii) चित्त

ii) **शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.**

अ) दररोज प्रसिद्ध होणारे - दैनिक

iii) **पुढील शब्दांचे वचन बदला.**

अ) डोळा - डोळे ब) काठ्या - काठी

iv) **पुढील शब्दाचे लिंग बदला.**

अ) बैल - गाय ब) उंदीर - उंदरीण

२) **पुढील वाक्ये शुद्ध करुन लिहा.**

i) कृतज्ञता आणि दातृत्व हे संपन्नता निर्माण करण्याचे मार्ग आहेत. ii) कारण तीही परदेशीच असे.

३) **योग्य विरामचिन्हे वापरा व वाक्य पुन्हा लिहा.**

i) “मावशी, तुम्ही कुठे राहता?” ii) गांधीजींनी ‘चले जाव’ ही घोषणा केली.

## विभाग ५ : उपयोजित लेखन

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा:**

**१) पत्रलेखन :**

दि. १५ सप्टेंबर २०१८
प्रति,
मा. दिलीप आंबेकर
विभागीय व्यवस्थापक,
राज्य परिवहन महामंडळ
औरंगपुरा, औरंगाबाद – ४३१००१
**विषय :** एकलव्य सहल योजनेअंतर्गत शालेय सहल नेण्याबाबत
माननीय महोदय,
सप्रेम नमस्कार,
मी गायत्री चित्रे (वर्ग १० वी ), औरंगाबाद येथील अनुग्रह कन्या हायस्कूल या शाळेची प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहित आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एकलव्य सहल योजनेबद्दल वर्तमानपत्रात माहिती वाचली. या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वप्रथम आपले हार्दिक अभिनंदन.
आमच्या शाळेची या वर्षाची सहल दौलताबाद, अजिंठा, वेरूळ या ठिकाणी पुढील महिन्यात नेण्याचे ठरवले आहे. या सहलीत अंदाजे १०० विद्यार्थी व आठ शिक्षकांचा समावेश असेल. आपल्या एकलव्य सहल योजनेअंतर्गत दोन बसेस आमच्या शाळेच्या सहलीसाठी उपलब्ध होऊ शकतील का ते कृपया कळवावे व नोंदणी प्रक्रियेसंदर्भात सूचना द्याव्यात ही विनंती.
मा. मुख्याध्यापकांच्या परवानगीने मी हे पत्र लिहित आहे. पत्राचे उत्तर लवकरात लवकर पाठवाल असा विश्वास वाटतो.
कळावे,
आपली नम्र,
कु. गायत्री चित्रे
विदयार्थी प्रतिनिधी,
अनुग्रह कन्या हायस्कूल,
औरंगाबाद – ४३१००१

**२) सारांश लेखन:**

'उन्हाळा' हा शब्द आपल्या मनात काहीतरी रसाळ, गोड आणि स्वादिष्ट जे खायला सगळ्यांना प्रिय असते ते घेऊन येतो. 'फळांचा राजा – आंबा' हा झाडांना लागतो. ते झाड ६० फुटांपर्यंत वाढते व फळे येण्यासाठी गरम व कोरडे हवामान लागते. साधारणत: चार ते सहा वर्षांनी झाडाला सोनेरी, पिवळे, हिरवे, लाल फळ येते व त्याचा गर गडद नारंगी छटा असलेला पिवळ्या रंगाचा, स्वादिष्ट गंध असलेला व गोड आणि रसाळ असतो. फळाला एकच बी असते. फळापासून लोणची, मुरंबे, रस, मिठाई बनते व जीवनसत्त्वांनी व खनिजांनी हे फळ समृद्ध असते.

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा.**

**१) जाहिरात लेखन.**

प्रवासी बॅग्ज

**''प्रवास तुमचा सुखकर प्रयत्न हाच निरंतर''**

**सुनंदा कारखानीस**

यांचे प्रवासी बॅग्जचे भव्य प्रदर्शन

**विविध आकाराच्या, सुंदर रंगांच्या, मजबूत, टिकाऊ**

बॅगांची विक्री

**मोठ्या प्रवासी बॅगांवर ३०% सूट**

मुलांचा खाऊ सांभाळणाऱ्या बॅगा

आजीचा बटवा जपणाऱ्या बॅगा

फक्त दोन दिवस

काय मग येताय ना!!!

दि. १ व २ मे, २०१८

सकाळी १० ते सायं. ८ संपर्क : ९२९२९९XXXX

पत्ता : शिवाई मैदान, कानडे चौक, पेण.

**२) पुढील शीर्षकावरुन कथालेखन करा.**

## अशी झाली फजिती

एका जंगलात एका झाडावर एक कावळा राहत असे. जंगलात भटकंती करून जे मिळेल त्यावर तो आपली गुजराण करीत होता. एके दिवशी सबंध जंगल पालथे घातले तरी त्याला काहीच खायला मिळाले नाही. उन्हात भटकत त्याने बरीच शोधाशोध केली. पण खायला काही मिळाले नाही. शेवटी तो जंगलाबाहेर आला. तिथे काही घरांची वस्ती होती भुकेने व्याकूळ झालेला कावळा वस्तीच्या भोवती घिरट्या घालू लागला. 'काव, काव' असंही आता तोंडून फुटत नव्हंत. इतक्यात एका घराच्या खिडकित त्याला एक भाकरीचा तुकडा दिसला. त्याने लगोलग झडप घालून तो मिळवला. मोठ्या आनंदात तो जंगलाच्या दिशेने उडू लागला.

जंगलात नेहमीच्या झाडावर बसून भाकरीचा तुकडा खायला सुरूवात करणार इतक्यात एक कोल्हा तिथे आला. कोल्ह्यानेही आज जंगलाला प्रदक्षिणा घातली असली तरी त्यालाही खायला काही मिळाले नव्हते. तोही भुकेला होता. त्याने अधाशीपणे कावळ्याच्या चोचीतल्या भाकरीच्या तुकड्याकडे बघितले व एक शक्कल लढवली.

कोल्हा झाडाखाली उभा राहिला व कावळ्याची स्तुती करू लागला. "कावळे दादा, तुमचा आवाज खूप गोड आहे. जंगलातल्या सगळ्या प्राण्यांना खूप आवडतो. तुमच्या गोड गळ्याची ख्याती आता जंगलाबाहेरच्या प्राण्यांपर्यंत पोहोचू लागली आहे. मी तुमचा आवाज ऐकण्यासाठी तुम्हाला शोधत इठे आलो आहे. तुमच्या मधुर कंठातून आता एक तान तरी ऐकवा!"

एवढी स्तुती कावळ्याने आजवर कधीच ऐकली नव्हती. कावळा हुरळून गेला. त्याने तान घेण्यासाठी तोंड उघडले, तोच त्याच्या तोंडातला भाकरीचा तुकडा खाली पडला. धूर्त कोल्ह्याने स्वार्थ साधला. कावळ्याला काही कळण्यापूर्वी कोल्हा भाकरीचा तेकडा घेऊन पळून गेला होता.

कोल्ह्याचे पोट भरले पण कावळ्याची मात्र फजिती झाली.

**तात्पर्य : दुसऱ्याच्या मेहनतीवर डोळा ठेवणाऱ्यांची नेहमी फजिती होते.**

**प्र.५ इ) खालील केखनपरकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.**

१)

भारत माझा, मी भारताचा
जीव ओवाळावा तरी, जीव किती हा लहान ।
तुझ्या शौर्यगाथेपुढे, त्याची केवढीशी शान।।

भारतीय सीमेवर लढायला जाण्यासाठी सुसज्ज झालेल्या जवानाला औक्षण करताना माय, भगिनींच्या मनात येणाऱ्या विविध भावनांचे वर्णन वरील काव्यपंक्तिमध्ये किती सार्थ शब्दांत केले आहे. भारतीय सैनिकाद्दल अभिमानाची, आपुलकीची भावना प्रत्येकाच्या मनात असते. माझ्या ही मनात ही भावना होतीच. एखाद्या सैनिकाशी आपली भेट व्हावी व मनातल्या शंकाची व सैन्याच्या पराक्रमाची गाथा त्याच्याकडून प्रत्यक्ष ऐकावी असे खूप वाटत असतांना सेकंड लेफ्टनंट कृष्णराव साने हे सेवानिवृत्त होऊन आमच्या शेजारी राहावयास आल्याने माझा आनंद गगनात मावेनासा झाला. एक दिवस मी त्यांना माझी इच्छा सांगितली. ते आनंदाने तयार झाले. मी व माझे मित्र त्यांच्या समोरच बसलो. कृष्णराव म्हणाले, "माझ्या छोट्या मित्रांनो, आज मी तुम्हाला माझी आत्मकथा सांगणार आहे". आम्ही ऐकू लागलो.

"मुलांनो, माझे नाव श्री.कृष्णराव मारोतराव साने. माझे आजोबा स्वातंत्र्य सैनिक होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी तुरुंगवास ही भोगला. इंग्रजांनी त्यांच्या केलेल्या छळाच्या अनेक गोष्टी आम्ही त्यांच्या तोंडून ऐकल्या आहेत. माझे वडील ही देशभक्त होते. भारतमातेची सेवा व रक्षण करणे हेच त्यांचे ध्येय होते. ते सैन्यात होते. त्यांनीही त्यांच्या सेवा काळातील भारतीय सेनेच्या पराक्रमाच्या अनेक गोष्टी आम्हांला सांगितल्या आहेत. देशभक्तिचे धडे बालपणी घरातच मिळाले आहेत. त्याच वेळी मी भारतीय सेनेत जायचे व देशासाठी लढायचे ठरवले."

महाविदयालयीन शिक्षण पुरे झाल्यावर मी सैन्यात भरतीचे प्रयत्न सुरू केले. सर्व अडचणी पार करून व परीक्षा पास करून मी सैन्यात भरती झालो. घरच्यांचे पाठबळ होतेच. खडतर सैन्य प्रशिक्षण पूर्ण केल्यावर माझी पोस्टिंग श्रीनगरच्या लष्करा ठाण्यावर झाली. मी सेकंड लेफ्टनंट म्हणून दाखल झालो होतो. पठाण टोळ्यांना व दहशतवादयांन पुढे करून शेजारील देशाने काश्मीरवर अनेक ठिकाणी बॉम्ब हल्ले केले. त्या पैकी श्रीनगरच्या बाजूने केलेले हल्ले ब्रिगेडियर एल.पी.सेन यांनी यशस्वीपणे व शौर्याने लढा देऊन परतवून लावले. मी त्यांच्याबरोबरच कार्यरत होतो. पुढे आमच्या तुकडीने झांगड हे गाव शत्रूकडून जिंकून घेतले. त्या वेळी आघाडीच्या रणगाड्यांबरोबर मी सुद्धा होतो. शत्रूसेनेने जागोजागी सुरुंग पेरले होते. सुरुंग निकामी करण्याचे काम मला करायचे होते. ते काढले नाही तर भारतीय सेनेचे रणगाडे व भारतीय जवान मोठ्या संख्येने उद्ध्वस्त झाले असते. काम जोखमीचे होते पण शत्रूवर आक्रमण करण्यासाठी ते करणे गरजेचे होते. त्यातच शत्रू सेनेकडून सातत्याने गोळ्यांचा व तोफांचा मारा होत होता. मृत्यूचे भय होतेच. पण मी स्वत:च्या प्राणांची पर्वा न करता सुरुंग शोधून नष्ट केले. भारतीय सेनेचा मार्ग मोकळा झाला. पण माझ्या पायाला व खांदयाला गोळी लागून मी जखमी झालो. दवाखान्यात उपचार घेऊन पुन्हा सेवेत रूजू झालो.

मित्रांनो गेल्यावर्षीच मी सेवानिवृत्त झालो. अनेक संकटावर मात करून मी भारतीय सेनेला आक्रमणासाठी मार्ग मोकळा करून देण्याचे जे शौर्य व हिंमत दाखवली त्याबद्दल भारत सरकारने मला 'परमवीरचक्र' हे पराक्रम व देशभक्तिसाठी असलेले बहुमानाचे पदक बहाल करून माझ्या शौर्याचा व देशभक्तिचा यथोचित गौरव केला आहे. मी समाधानी आहे.

मी जरी सेवानिवृत्त झालो असलो तरी मनाने मी आजही सक्षम आहे. वेळ आल्यास मी पुन्हा एकदा शत्रूसंगे लढण्यास सीमेवर जाण्यास तयार आहे. मी भारतीय असल्याचा मला अभिमान आहे. जय हिंद!.

से. ले. कृष्णराव बोलायचे थांबले. त्यांची कथा खरोखरच प्रेरणादायी आहे. त्यांचे अनुभव व पराक्रम ऎकून आम्ही भारतीय सेनेत प्रवेश करण्याचे ठरवले आहे. सें. ले. कृष्णरावांचा प्रत्येक भारतीयाला सार्थ अभिमान आहे.